महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 30 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 301 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# राज्यात नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरणासह सुधारित पीक विमा लागू - मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यात यापुढे सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात येणार आहे. तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीमध्येही आणि टोलमध्येही सूट देण्याचा विचार राज्य सरकार करत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच राज्यातील जहाज निर्मितीलाही प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळात घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळामध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची माहिती दिली.

**1 पहलगाम हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबाला प्रत्येकी 50 लाखांची मदत**

पहलगाम हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या राज्यातील व्यक्तींच्या कुटुंबाला प्रत्येकी 50 लाखांची मदत करण्यात येणार आहे. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवण्याचा आणि त्यांच्या कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी देणे हा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे.

**2 इलेक्ट्रिक व्हेईकल पॉलिसी**

राज्य सरकारने एक नव्या इलेक्टिक व्हेईकल पॉलिसीचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये चार्जिंग स्टेशन्सची सुविधा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इलेक्ट्रिक व्हेईकल्सच्या खरेदीवर सबसिडी आणि काही प्रमाणात टोलवरही सूट देण्यात येणार आहे.

**3 शिप ब्रेकिंग, शिप बिल्डिंग वाढवण्यात येणार**

शिप ब्रेकिंग, शिप बिल्डिंग वाढवण्यात येणार आहे. त्यातून रोजगार निर्मिती होते. राज्यात तीन मोठे बंदर आहेत. त्यातून व्यवसाय निर्माण होऊ शकते. त्या मुद्द्यावर एक पॉलिसी करण्यात आली आहे.


**4 सुधारित पीक विमा योजना लागू करणार**

राज्यात सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात येणार आहे. 1 रुपयात विमा योजनेत लाखो बोगस अर्ज आले. लोकांनी निधीचा अपव्यय करणारे षडयंत्र केले. त्यामुळे गरजू व्यक्ती या योजनेपासून वंचित राहू नये म्हणून सुधारित योजना आणणार आहे. विमा कंपन्यांचा नव्हे तर शेतकऱ्यांचा लाभ व्हायला हवा. शेतकऱ्यांना मल्चिंग पेपर, ट्रॅक्टर, ट्रीप यामध्ये गुंतवणूक करणारी नवी योजना लागू केलेली आहे.

**5 भिक्षा प्रतिबंध अधिनियम**

भिक्षा प्रतिबंध अधिनियम, 1951 अंतर्गत महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध नियम, 1964 मधील नियम 27(ब) (3) मधील तरतूदीमध्ये सुधारणा. भिक्षागृहातील व्यक्तींना 5 रुपये ऐवजी आता 40 रुपये प्रतिदिन मिळणार

# ठाणे मनपात सहा प्रभागांना नवे सहायक आयुक्त



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: ठाणे महापालिकेतील अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या तीन महिला अधिकाऱ्यांकडील कार्यभार काढून नवीन आलेल्या सहा सहाय्यक आयुक्तांकडे पदभार सोपविण्यात आला आहे.

ठाणे महापालिकेत सहाय्यक आयुक्त पदाच्या सुमारे १८ जागा रिक्त होत्या. राज्य सरकारने मागील आठवड्यात सहा अधिकाऱ्यांची ठाणे महापालिकेत बदली केली होती. त्यांच्याकडे आज सहा प्रभाग समितीचा कार्यभार सोपाविण्यात आला. वादग्रस्त दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तपदी शिवप्रसाद नागरगोजे, वर्तकनगर प्रभात समितीच्या सहाय्यक आयुक्तपदी विजय कावळे, लोकमान्य-सावरकर प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तपदी सोमनाथ बनसोडे, माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तपदी सोनल काळे यांची नियुक्ती करण्यात आली तर उथळसर प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तपदी भालचंद्र घुगे यांना कायम ठेवण्यात आले आहे. दिवा प्रभात समितीचे राजेंद्र गिरी यांच्याकडे कळवा प्रभाग समितीचा कार्यभार सोपाविण्यात आला आहे.


वर्तकनगर प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तपदी तनुजा रणदिवे, स्मिता सुर्वे यांच्याकडे माजिवडा-मानपाडा आणि ललिता जाधव यांच्याकडे कळवा प्रभाग समितीचा अतिरिक्त कार्यभार सोपाविण्यात आला होता. त्यांच्याकडील कार्यभार आता काढून घेण्यात आल्याचे आदेशात म्हटले आहे.

# जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे जिल्हास्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली:** ठाणे जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा जीवनदीप महाविद्यालय गोवेली यांच्या सहकार्याने दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री.रविंद्र घोडविंदे,श्री शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री.अनंत चाळके, निवृत्त नौदल अधिकारी श्री.दत्तात्रय उतेकर, श्री.नितीन कुडाळकर,अध्यक्ष ठाणे पॉवरलिफ्टिंग, सरचिटणीस श्री.नवनाथ गायकर,माजी सरचिटणीस श्री. देवदत्त भोईर, माजी अध्यक्ष श्री. विनायक कारभारी,श्री.प्रशांत दुमडे, श्री.अमोल कडूसकर, श्री.सुरेश चेडे, पालघर जिल्हा सरचिटणीस श्री.रवींद्रनाथ गायकर,जीवनदीप महाविद्यालयाचे क्रीडा संचालक श्री.मोहनीश देशमुख व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या स्पर्धेत पुरुष गटात राजेश लांजेकर याने व महिला गटात सुश्मिता देशमुख हिने स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट स्पर्धक होण्याचा बहुमान मिळविला. तर पुरुष गटात एनर्जीया जिम ठाणे यांनी ६० गुण मिळवून सांघिक विजेतेपद पटकावले. तर महिला गटात द युनायटेड स्पोर्ट्स क्लब ठाणे यांनी ४५ गुण मिळवून विजेतेतेपद पटकावले.या स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंची निवड पुढील महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ठाणे जिल्ह्याच्या संघात झाली आहे.





# जागतिक शिखर परिषदेत सादर होणार 'देवाभाऊ' चष्मा




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंधत्व निवारणाच्या मोहिमेत गेली ३४ वर्ष समाजकार्य करणारे बदलापुरातील साकीब गोरे यांनी आता जागतिक क्रांतीच्या दृष्टीनं एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यांनी आपल्या व्हिजन फ्रेंड साकिब गोरे या संस्थेच्या माध्यमातून अवघ्या ३३ रुपयात चष्मा बनवला आहे. नेपाळच्या काठमांडूत होणाऱ्या जागतिक शिखर परिषदेत 'देवाभाऊ' नावाने हा चष्मा सादर केला जाणार आहे. या समिटमध्ये IAPB आणि WHO ने या चष्म्याची निवड केल्यास अमेरिकेपासून १४० देशांमध्ये गोरगरीब गरजू लोकांना ३३ रुपयांत म्हणजेच ०.३८ डॉलर्स मध्ये हा चष्मा उपलब्ध होईल.

IAPB अर्थात जागतिक अंधत्व निवारण ही संस्था अंधत्व आणि दृष्टीदोष निवारणासाठी जागतिक स्तरावर काम करते. या संस्थेच्या माध्यमातून नेपाळच्या काठमांडूत २९ एप्रिल ते १ मे असे तीन दिवस जागतिक शिखर परिषदेचं आयोजन करण्यात आले आहे. या शिखर परिषदेत ७६ देशातील ७०० नामांकित संस्था सहभागी होणार आहेत. यात बदलापुरातील व्हिजन फ्रेंड साकिब गोरे या संस्थेचाही समावेश आहे.

आमदार किसन कथोरे यांच्या सहकार्यातून त्यांनी आतापर्यंत १७०० गावांमधून २६ लाख लोकांची मोफत

***अवघ्या ३३ रुपयात १४० देशांना चष्मा पुरवण्याचा संकल्प***

***बदलापूरच्या साकिब गोरेंची गरुडझेप***

***काठमांडूच्या समिटमध्ये सर्वात स्वस्त 'देवाभाऊ' चष्म्याची निवड होणार?***

नेत्र तपासणी केली आहे. तसच १७ लाख चष्म्यांचही वाटप केले आहे.

आता साकिब गोरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामांपासून प्रेरणा घेत त्यांच्या नावाने सर्वात स्वस्त, टिकाऊ आणि उपयुक्त अशा चष्म्यांची सीरिज बनवली आहे. ३३ रुपयांपासून ते २६० रुपयांपर्यंतच्या या चष्म्यांमुळे जगात क्रांती घडेल असा विश्वास साकिब गोरे यांनी व्यक्त केला आहे. सध्या जगभरातील २.५ अब्ज लोक दृष्टीदोषाने त्रस्त आहेत. त्यापैकी १.१ अब्ज लोकांपर्यंत अद्यापही चष्मा पोहोचू शकलेला नाही. चष्म्याची किंमत जास्त असल्यामुळे गोरगरीब लोकांवर चष्म्याअभावी अंधारात चाचपडण्याची वेळ आली आहे. मात्र त्यांना अवघ्या ३३ रुपयात 'देवाभाऊ' चष्मा मार्ग दाखवण्याचं काम करेल

असा दावा साकिब गोरे यांनी केला आहे. काठमांडू येथे होत असलेल्या समिटमध्ये जगभरातल्या सातशे संस्थांपैकी तीन संस्थाची सर्वात कमी दरातील चष्म्यांसाठी निवड करण्यात आली आहे. त्यापैकीच एक व्हिजन फ्रेंड साकिब गोरे ही संस्था आहे. या तीन संस्थांमधून एका संस्थेची IAPB कडून अंतिम निवड केली जाणार आहे. त्यामुळे काठमांडूच्या समिटमध्ये सर्वात स्वस्त चष्मा म्हणून बदलापुरतील सामाजिक कार्यकर्ते साकिब गोरे यांच्या 'देवाभाऊ सीरिज' चष्म्यांची निवड होणार का? याकडेच संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागले आहे.

# भिवंडीत वीटभट्टी मालकांकडून बेकायदा माती उत्खनन

**माती उत्खनन केल्याबाबत प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली होती. ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली जमिनीचा पंचनामा करून माती उत्खनन करणाऱ्याविरोधात बोजा चढवून कारवाई केली जाईल, अशी माहिती तलाठी किशोर हंबीर यांनी दिली आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. २९ (वार्ताहर)**

भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागातील आदिवासी पाड्यांवर स्थानिक वीटभट्टी मालकांकडून विनारॉयल्टी शेकडो ब्रास माती उत्खनन केले जात आहे. याबाबत आदिवासी, शेतकऱ्यांकडून तक्रारी करण्यात आल्या असूनही महसूल प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. तालुक्यातील कुहे ग्रामपंचायती हद्दीत सर्वे क्रमांक १५६/२ ही सावकाराच्या नावे असलेल्या शेतजमिनीवर रवींद्र सापटा यांच्या वडिलांच्या नावे नोंद आहे. या जमिनीतून वीटभट्टी व्यावसायिक आर्थिक फायद्यासाठी रॉयल्टीशिवाय माती उत्खनन करीत आहेत. याप्रकरणी रवींद्र सापटा यांनी भिवंडी येथील उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांकडे तक्रार केली आहे. कुहे गावाअंतर्गत टेपाचा पाडा आदिवासी वस्ती असलेल्या ठिकाणी वीटभट्टी मालकांनी सर्वत्र माती खोदून घेतल्याने येथील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या व जुन्या विहिरीकडे जाणारा रस्ता उद्ध्वस्त झाला आहे. तर स्मशानभूमी परिसरातील खोदकामामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. याप्रकरणी कुहे ग्रामपंचायतीचे माजी सरपंचांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

**पावसाळ्यात शेतावर जाणे कठीण**

**शंभर टक्के आदिवासी वस्ती असलेल्या टेपाचा पाडाची लोकसंख्या ३५० च्या आसपास आहे. येथील ग्रामस्थांना वाड्या-पाड्यावर शेतावर जाण्यासाठी पावसाळ्यात रस्ता नसतो, अशी तक्रार केली आहे. याबाबत स्थानिक ग्रामपंचायत तहसीलदार कार्यालयात तक्रार करूनही न्याय मिळत नसल्याची खंत किसन ठोंबरे यांनी व्यक्त केली आहे.**




# आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी जिल्ह्यात अद्यापही २ हजार ९६४ जागा रिक्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** जिल्ह्यात आरटीई अंतर्गत होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेसाठी अद्यापही २ हजार ९६४ जागा रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. ठाणे जिल्ह्यात ६२७ शाळेतून ११ हजार ३२२ जागांवर आरटीई प्रक्रिया राबविली जात आहे. ११ हजार ३२२ जागांपैकी आतापर्यंत ८ हजार ३५८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असल्याची माहिती ठाणे जिल्हा शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

वंचित, दुर्बल घटकातील मुलांना उत्तम दर्जेचे शिक्षण मिळावे यासाठी शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत २५ टक्के जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. सध्या २०२५-२६ ग्रा शैक्षणिक वर्षासाठी गेले चार महिन्यांपासून प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. ठाणे जिल्ह्यात ६२७शाळेतून ११ हजार ३२२ जागांवर आरटीई प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेला १४ जानेवारी पासून सुरुवात झाली असून ११ हजार ३२२ जागांसाठी जिल्ह्यातून २५ हजार ७७४ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. यातून, सुरुवातीला १० हजार ४२९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी दोन ते तीन वेळा मुदतवाढ देऊनही केवळ ६ हजार ७०६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्याची माहिती समोर आली होती. विद्यार्थ्यांची निवड झाल्याचा संदेश पालकांच्या दुरध्वनी क्रमांकावर पाठविण्यात आला होता.

काही पालकांनी या संदेशाकडे दुर्लक्ष केल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश होऊ शकले नाही, असा दावा त्यावेळी शिक्षण विभागाकडून करण्यात आला होता. त्यानंतर, उर्वरित जागांसाठी पहिली प्रतिक्षा यादी जाहीर करण्यात आली. त्यात, २ हजार ७०५ विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यापैकी १ हजार १८५ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. तर, दुसऱ्या प्रतिक्षा यादीत ९५५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यातून, ४६७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहे. आतापर्यंत ११ हजार ३२२ जागांपैकी ८ हजार ३५८ जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. तर, २ हजार ९६४ जागा अद्यापही रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे.



# गीतासार



### अध्याय ९
### राजविद्याराजगुह्ययोगः

पत्रं पुष्पं फलं तोयं ये मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ ९-२६ ॥

जो कोणी भक्त मला प्रेमाने पान, फूल, फळ, पाणी इत्यादी अर्पण करतो, त्या शुद्ध बुद्धीच्या व निष्काम प्रेमी भक्ताने प्रेमाने अर्पण केलेले ते पान, फूल इत्यादी मी सगुण रूपाने प्रकट होऊन मोठ्या प्रीतीने खातो. ॥ ९-२६ ॥

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ ९-२७ ॥

हे कौन्तेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), तू जे कर्म करतोस, जे खातोस, जे हवन करतोस, जे दान देतोस आणि जे तप करतोस, ते सर्व मला अर्पण कर. ॥ ९-२७ ॥

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः । संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ ९-२८ ॥

अशा रीतीने ज्यामध्ये सर्व कर्मे मला भगवंताला अर्पण होतात, अशा संन्यासयोगाने युक्त चित्त असलेला तू शुभाशुभफळरूप कर्मबंधनातून मुक्त होशील आणि मला येऊन मिळशील. ॥ ९-२८ ॥

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः । ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ ९-२९ ॥

मी सर्व भूतमात्रात समभावाने व्यापून राहिलो आहे. मला ना कोणी अप्रिय ना प्रिय. परंतु जे भक्त मला प्रेमाने भजतात, ते माझ्यात राहतात आणि मीही त्यांच्यात प्रत्यक्ष प्रकट असतो. ॥ ९-२९ ॥

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ९-३० ॥

जर एखादा अत्यंत दुर्वर्तनीसुद्धा अनन्यभावाने माझा भक्त होऊन मला भजेल, तर तो सज्जनच समजावा. कारण तो यथार्थ निश्चयी असतो. अर्थात त्याने ईश्वरभजनासारखे दुसरे काहीही नाही, असा पूर्ण निश्चय केलेला असतो. ॥ ९-३० ॥

# सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर



सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री- पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला. माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून नवी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष, जात-पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचारांची अंमलबजावणी पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या सहकार्याच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती. महात्मा बसवेश्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांना विनम्र अभिवादन!

- श्याम बसप्पा ठाणेदार

# अक्षय तृतीया



अक्षय तृतीया हा हिंदू धर्मातील एक सण आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला हा दिवस सनातन धर्मात अत्यंत शुभ मानला जातो. अक्षय तृतीयेचा दिवस वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीयेला साजरा केला जातो. या दिवशी केलेले कोणतेही शुभकार्य अक्षय म्हणजेच अविनाशी मानले जाते. तसेच भगवान विष्णूच्या सहाव्या अवताराचे रूप असलेल्या परशुरामांचा जन्म याच दिवशी झाला असल्याने परशुराम जयंती देखील यादिवशी साजरी करतात.

अक्षय तृतीय हिंदू धर्मातील अत्यंत शुभ सण असून हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने याला शुभ दिन मानतात. यादिवशी काही वस्तू खरेदी करणे अत्यंत भरभराटीचे लक्षण मानले जाते. देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा केल्याने त्यांची कृपा यादिवशी मिळते आणि घरात सुखशांती येते समृद्धी मिळते असे मानतात. अक्षय तृतीयाच्या दिवशी पूजा कशी करावी, अक्षय तृतीयेचे महत्व काय आहे जाणून घेऊयात या सणाची माहिती.

### पौराणिक कथा

धार्मिक पौराणिक कथेनुसार भगवान श्रीकृष्णांनी पांडवांना अक्षय पात्र भेट दिले होते. यामुळे त्यांना आपल्या प्रवासात उपाशी राहावे लागले नाही. कारण अक्षय या शब्दाचा अर्थच आहे अविनाशी म्हणजेच कधीही न संपणारा. यामुळे हा दिवस पवित्र मानतात कारण यादिवशी खरेदी केलेली वस्तू शुभ परिणाम देते, आयुष्यात भरभराटी घेऊन येते.

### काय खरेदी करावे ?

अक्षय तृतीया हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने यादिवशी शुभकार्य केली जातात. तसेच नवीन वस्तू देखील घेतात. अक्षयतृतीयेला सोने आणि चांदी घेणे अत्यंत शुभ मानले जाते. तसेच यादिवशी वास्तू खरेदी करणे सुद्धा शुभ मानतात. गृहप्रवेश केला जातो, वास्तुशांती देखील घातली जाते. नवीन गाडी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर अनेकजण घेतात.

### दानाचे महत्व

अक्षय तृतीयेच्या दिवशी दान करण्याला अत्यंत महत्व आहे. यादिवशी गोर गरिबांना अन्नदान करणे शुभ मानतात. तसेच पक्षांना धान्य टाकणे, गरजुंना आवश्यक वस्तू दान करणे महत्वाचे मानले जाते. यादिवशी तुम्ही कोणत्याही स्वरूपाचे दान करू शकता.

### पूजा विधी

अक्षय तृतीयेच्या दिवशी देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा करण्याची मान्यता आहे. देवी लक्ष्मीला आपण धनसंपत्तीचे प्रतीक मानतो. असे म्हणतात यादिवशी देवीची पूजा केल्याने तिची कृपा प्राप्त होऊन घरात धनसंपत्ती, समृद्धी येते. दिवाबत्ती, धूप हार फुले वाहून देवीची आराधना करावी. काहीजण कलश मांडून देखील पूजा करतात. तसेच घरात गोडाचा नैवेद्य करून तो देवाला अर्पण करावा.

# 'दाभोलकरहत्या आणि मी' या झंझावाती पुस्तकाचे प्रकाशन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 'दाभोलकर हत्या आणि मी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा काशीनाथ धुरू सभागृह येथे नुकताच पार पडला. यावेळी 'दाभोलकर हत्या आणि मी' या पुस्तकाचे प्रकाशन स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजित सावरकर, हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय सचिव अधिवक्ता संजीव पुनाळेकर, हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर, सनातन संस्थेचे प्रवक्ता अभय वर्तक आणि 'दाभोलकर हत्या आणि मी' या पुस्तकाचे लेखक विक्रम भावे यांच्या हस्ते करण्यात आले.

पहलगाम येथील आक्रमण हे हिंदू म्हणून केलेले पहिले आक्रमण नाही. यापूर्वी काश्मिरमधून काश्मिरी पंडीतांना हिंदू म्हणूनच निर्वासित करण्यात आले होते. बंगालमधील मुर्शिदाबाद येथे यापूर्वीच हिंदूंच्या क्रूरपणे हत्या करण्यात आल्या. त्यामुळे अशा घटनांचा प्रतिशोध घेतला गेला नाही, हिंदू संघटित होत नाहीत, तोपर्यंत अशी आक्रमणे चालूच रहातील. विक्रम भावे यांनी हिंदूंवरील अत्याचार त्यांच्या पुस्तकातून मांडला आहे. हिंदूंवर दहशतवादाचे आरोप झाले, जर हिंदू दहशतवादी असते तर विक्रम भावे तुरुंगात गेले नसते. आतंकवादी जर धर्म म्हणून हिंदूंना गोळ्या घालत असतील, तर धर्मासाठी हिंदू मुसलमानांवर आर्थिक बहिष्कार का टाकू शकत नाहीत ? सध्याच्या स्थितीत आपल्या आजूबाजूला व्यवसाय करणारे बांगलादेशी घुसखोर आहेत. येत्या ५-१० वर्षांत महाराष्ट्रातील बांगलादेशी घुसखोरांना बाहेर काढले नाही, तर सध्याचे सरकार हे शेवटचे हिंदुत्वनिष्ठ सरकार ठरेल असे प्रतिपादन स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजित सावरकर यांनी यावेळी केले.

पहलगाम येथील आतंकवादी आक्रमणामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या देशवासियांना कार्यक्रमाच्या प्रारंभी श्रद्धांजली वहाण्यात आली. समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर, हिंदुत्वनिष्ठ तसेच या वेळी कठीण प्रसंगातही हिंदुत्वाचे कार्य करण्यासाठी धीरोत्तरपणे विक्रम भावे यांच्या पाठीशी उभ्या रहाणाऱ्या त्यांच्या पत्नी वैदेही भावे आणि मुलगी इंद्रश्री आणि या खटल्यात हिंदुत्वनिष्ठांची बाजू मांडणाऱ्या अधिवक्ता सुवर्णा वत्स-आव्हाड यांसह राष्ट्र आणि धर्मप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते ०१ मे ध्वजारोहण कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनानिमित्त कोकण विभागीय स्तरावरील शासकीय ध्वजारोहण गुरुवार दि.1 मे, 2025 रोजी सकाळी 08.00 वाजता विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते कळंबोली सेक्टर 17 येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर होणार आहे.

महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनाचा हा सोहळा सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करुन यशस्वीरित्या व उत्साहात साजरा होणार आहे. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास नागरिक, पत्रकार, शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित राहावे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, उन्हाची तीव्रता लक्षात घेता उपस्थितांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# टिटवाळ्यातील अनाधिकृत बांधकामांवर हातोडा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अ प्रभाग क्षेत्रातील टिटवाळा प्रभागातील बल्याणी येथे सुरू असलेल्या अनाधिकृत बांधकामावर "अ" प्रभागाचे सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या पथकाने धडक कारवाई करत निष्कसनाची कारवाई केली. या कारवाईत बल्याणी येथील सुरू असलेले १६७ सिमेंट कॉंक्रीटचे दगडी ज्योते तसेच ३ बांधकाम पूर्ण केले रूमचे



१६७ ज्योते व ३ रुमचे बांधकाम केले जमिनदोस्त

बांधकाम जमिनदोस्त करण्यात आले. ही कारवाईत दोन जीसीबी ठेकेदारांची १५ माणसे, पोलीस कर्मचारी , पालिकेचे वरिष्ठ लिपिक आणि महापालिका कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आली. सदर कारवाईच्या बांधकाम व्यावसायिक व स्थानिक नागरिकाचा प्रचंड विरोध केला. परंतु त्यांच्या विरोधाला न जुमानता सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या नेतृत्वाखाली सदरची कारवाई पूर्ण करण्यात आली.

# पायल बसुदे एएफसी वुमेन्स एशियन कपची टॉपर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या उल्हासनगर मधील अनेक व्यक्तिरेखांनी जागतिक पातळीवर आपलं नाव कोरलं आहे. नुकतेच २०२६ च्या फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघा तर्फे टॉपर गोलकीपर म्हणुन निवड उल्हासनगरची कन्या पायल बसुदे हिची निवड झाली आहे. पायल रमेश बसुदे महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील एक भारतीय व्यावसायिक फुटबॉलपटू आहे. जी भारतीय महिला लीग क्लब गोकुलम, केरळ फुटबॉल क्लब, जश युनाइटेड क्लब आणि भारताच्या राष्ट्रीय फुटबॉल संघासाठी गोलरक्षक म्हणून खेळली आहे. तिने वरिष्ठ महिला राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेतही महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केलंय. याआधी पिफ़ा स्पोर्ट्स, ओडिशा एफसी, किंग स्टार स्पोर्ट्स अकादमी आणि फ्युचर स्टार फुटबॉल क्लबसाठी खेळली होती. तिने २७ मार्च ते ९ एप्रिल २०२३ या कालावधीत उत्तराखंड येथे झालेल्या २७ व्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय फुटबॉल चॅम्पियनशिप २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र संघाचे नेतृत्व केले आहे. पायल बसुदेने २०२४ एसएएफएफ महिला चॅम्पियनशिपमध्ये नेपाळ विरुद्धच्या उपांत्य फेरीत भारतासाठी वरिष्ठ आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. भारतीय महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक क्रिस्पिन छेत्री यांनी २० ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत दुबई येथे खेळल्या जाणाऱ्या पिंक लेडीज चषकापूर्वी शिबिरासाठी ३२ संभाव्य खेळाडूंमध्ये तिचे नाव दिले होते. पायल बसुदे ही अंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघा तर्फे गोलकीपर म्हणुन निवडली गेली आहे, कोरिया प्रजासत्ताक, रशिया, थायलंड, उझबेकिस्तान, जॉर्डन आणि भारत हे वरिष्ठ आंतरराष्ट्रीय मैत्री स्पर्धेतही भाग घेत आहे.

उल्हासनगर ची कन्या पायल बसुदे हीची एएफसी वुमेन्स एशियन कप 2026 फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघा तर्फे टॉपर गोलकीपर म्हणुन निवड होणे हि उल्हासनगर वासियांसाठी अत्यंत गौरवशाली क्षण आहे.

# रायगड जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये विशेषतः अक्षय तृतीयेसारख्या शुभमुहूर्तावर बालविवाहांचे प्रमाण वाढते. त्यामुळे जिल्ह्यात यंदा बालविवाह होऊ नये म्हणून सर्व संबंधित यंत्रणांना सतर्कतेचा बाळगावी तसेच दुर्गम भागात जनजागृती करावी अश्या सूचना अपर जिल्हादंडाधिकारी सुनील थोरवे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीत दिल्या.

विविध यंत्रणांनी आतापर्यंत घेतलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये मुलीचे वय १८ वर्षे व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असावे लागते. अन्यथा संबंधितांवर एक लाख रुपये दंड व दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते. विवाह सोहळ्यात सहभागी पुरोहित, मंडप व्यावसायिक, वर-वधूंचे पालक, तसेच ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच यांच्यावरही कारवाईची तरतूद आहे.

अक्षय तृतीया सण दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी असल्याने त्यादिवशी विशेषतः धार्मिक स्थळे, मंगल कार्यालये, बीचवरील हॉटेल्स यावर लक्ष ठेवण्यात येईल. गावांमध्ये विवाह कार्यक्रम होत असल्यास सरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका आणि ग्रामसेवक यांनी मुला-मुलींच्या वयाची शहानिशा करावी, असे आदेश अपर जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आले.

ग्राम बाल संरक्षण समित्यांच्या माध्यमातून बालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. आदिवासी प्रकल्प विभागाला किशोरवयीन मुलामुलींची माहिती घेऊन स्थानिक यंत्रणांना पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या. रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल, उरण, सुधागड पाली आणि कर्जत तालुक्यात विशेष लक्ष देण्यात येणार असून, गावांमध्ये बैठका घेऊन बालविवाह प्रतिबंधासाठी प्रभावी पावले उचलली जाणार आहेत. बालविवाहासारख्या अघोरी प्रथेला आळा घालण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे आणि रायगड जिल्ह्याला बालविवाहमुक्त करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

१०९८ टोल फ्री क्रमांक : जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी १०९८ या टोल फ्री क्रमांक माहिती द्यावी. या क्रमांकावर माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

# रेसिपी
## केळ्याचे वेफर्स



### साहित्य

कच्ची केळी - 7 ते 8
तेल - तळणीसाठी
हळद - 2 चमचे
लाल तिखट - 1 चमचा
मीठ

### कृती

सर्वात आधी कच्ची केळी स्वच्छ धुवून त्यावरची साल काढून घ्या. केळ्याचे साल काढल्यानंतर त्याचे काप करावेत.

यानंतर एका भांड्यात पाणी घेऊन हळद, मीठ घालून त्यात केळ्याचे काप बुडवून ठेवा.

5 ते 6 मिनिटानंतर पाण्यातील केळ्याचे काप डिशमध्ये काढून घ्यावेत.

दुसरीकडे कढईत तेल गरम करण्यास ठेवा.

तेल गरम झाले की, केळ्याचे काप तळून घ्यावेत.

केळ्याचे काप हलके सोनेरी रंगाचे होईपर्यत तळून घ्यावेत.

आता तुम्हाला हवे असल्यास तयार केळ्याच्या वेफर्सवर लाल तिखट, मीठ भुरभुरा आणि गरमा गरम सर्व्ह करा.

# ऍड.वैशाली घरत झाल्या नोटरी ऑफिसर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : वैशाखरे गावचे सुपुत्र कै.तानाजी अनंत घरत (घरत तात्या) यांची कन्या व मुरबाड येथील प्रसिद्ध वकील वैशाली घरत यांची भारत सरकारच्या विधी व न्याय मंत्रालयाकडून नोटरी ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही मुरबाड तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. वैशाली घरत या मुरबाड तालुक्यातील पहिल्या महिला वकील आणि आता पहिल्या महिला नोटरी ऑफिसर म्हणून ओळखल्या जाणार आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे मुरबाडसह संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे. त्यांच्या नियुक्तीपत्रात त्यांना देशातील विविध कायदेशीर कागदपत्रांवर प्रमाणीकरण, साक्षीदार म्हणून कामकाज व इतर नोटरीशी संबंधित अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यांच्या अनुभवसंपन्न कार्यशैलीमुळे आणि कायद्याच्या सखोल ज्ञानामुळेच त्यांना ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, असे स्थानिक वकिलांमध्ये बोलले जात आहे. वैशाली घरत यांचे अभिनंदन करताना अनेक मान्यवरांनी मते व्यक्त केली की, "मुरबाडसारख्या ग्रामीण भागातील महिलांसाठी हा एक प्रेरणादायी क्षण आहे. त्यांच्या यशाने इतर महिलांनाही न्याय क्षेत्रात करिअर करण्यासाठी नवी दिशा मिळेल. वैशाली घरत यांनी सांगितले, ही जबाबदारी स्वीकारताना मला अत्यंत आनंद होत आहे. समाजसेवेचा वडिल घरत तात्या यांच्याकडून मिळालेला वारसा, मी सदैव प्रामाणिकपणे व निष्पक्षपणे जपून काम करण्याचा प्रयत्न करेन." निश्चितच ऍड.वैशाली घरत ह्या सर्व समाजातील महिला वर्गासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या या यशामुळे मुरबाडच्या न्यायिक क्षेत्रात एक नवा अध्याय सुरु झाला आहे.

# कल्याण डोंबिवली शहरातील बांगलादेशीं विरुद्ध कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे आदेशान्वये सोमवार २८तारखेला पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ कल्याण अंतर्गत पोलीस ठाणे अवैधरित्या वास्तव्य करत असलेले बांगलादेशी नागरिकांबाबत शोध मोहिम राबविण्यात आली होती. गोपनीय बातमीव्दारे कल्याण व डोबिवली शहर मधील संशयीत इसमांना पोलीस ठाणे येथे बोलावुन त्यांचेकडील आधारकार्ड, पॅनकार्ड व इतर कागदपत्रांची सखोल चौकशी



करण्यात आली. संशयीत इसमांचे कागदपत्रे चौकशी दरम्यान एकुण ०६ बांगलादेशी नागरिक अवैधरित्या वास्तव्य करत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचे विरूध्द पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३,४ विदेशी नागरिक कायदा १९४६ चे कलम १३,१४(अ)(ब) प्रमाणे कारवाई करून अनुक्रमे महात्मा फुले चौक पोलीस ठाणे-०१, खडकपाडा पोलीस ठाणे-०१, बाजारपेठ पोलीस ठाणे-०१ व टिळकनगर पोलीस ठाणे-०१ मध्ये असे एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ कल्याण हददीत माहे जानेवारी ते एप्रिल पर्यत एकुण ३८ अवैधरित्या वास्तव्य करणारे बांगलादेशी नागरिक विरूध्द एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तरी यापुढेही कल्याण व डोबिवली शहरात अवैधरित्या राहणारे बांगलादेशी नागरिक विरूध्द कारवाई सुरू राहणार आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# जीवनदीपच्या विद्यार्थ्यांनी मिळवले यश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : जीवनदीप महाविद्यालय गोवेलीचे विद्यार्थी क्रीडा क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असतात. आणि आज याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. दिनांक 26 ते 27 एप्रिल 2025 रोजी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी नाशिक या ठिकाणी झालेल्या ॲथलेटिक्स 2025 या स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. रीना शहा हिने शॉर्ट पुट स्पर्धेत कास्यपदक मिळवले आणि संस्थेचे नाव पुन्हा एकदा उंचावले. तिच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, प्राचार्य डॉ के बी कोरे, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे क्रीडा शिक्षक मोहनीश देशमुख यांनी तिचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# खडवलीतील अनधिकृत बांधकामावर महसूल विभागाची धडक कारवाई



## चाळीचे बांधकाम व जोते भुईसपाट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : खडवली पुर्वेतील अनधिकृत बांधकामावर कल्याण तहसीलदार कार्यालया अंतर्गत महसूल विभागाने धडक कारवाई करुन चाळीचे बांधकाम व जोते फाऊंडेशन बांधकाम भुईसपाट केले आहे. यापुढेही अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई केली जाईल असे नायब तहसीलदार नितीन बोडके यांनी माहिती दिली.

खडवली पुर्व सर्व्हे नं 57/1अ व 57/2 या मध्ये अनधिकृत बांधकामे बांधण्यात आली होती. याबाबत जिल्हा अधिकारी यांच्या कडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेऊन जिल्हा अधिकारी आदेशानुसार अनाधिकृत बांधकामावर पथक प्रमुख नायब तहसिलदार नितीन बोडके व खडवली मंडळ अधिकारी दर्शना भावे यांनी जागेवर जाऊन अनधिकृत बांधकामे भुईसपाट केली.

या कारवाईत बेहेरे खडवली ग्रामपंचायत, महावितरण कार्यालय, अग्निशामन दल, ग्राम महसूल अधिकारी, टिटवाळा पोलीस स्टेशन यांनी सहकार्य केले. यावेळी पथक प्रमुख नायब तहसीलदार नितीन बोडके यांनी सांगितले की जिल्हा अधिकारी यांच्या आदेशानुसार अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली असुन सात फाउंडेशन, जोते बांधकाम व चाळीचे बांधकाम तोडण्यात आले. यापुढेही अशीच धडक अनाधिकृत बांधकामावर कारवाई सुरू राहणार आहे.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी नियोजन करणे आवश्यक

## - जिल्हाधिकारी किशन जावळे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : रायगड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. आपत्ती काळात सर्व यंत्रणानी सतर्क व दक्ष रहावे, तसेच मान्सून पूर्व तयारी करताना सर्व बाबींची काटेकोरपणे तपासणी आणि उपाययोजना करावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले. नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय मान्सून पूर्व तयारी आढावा बैठक 2025 चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्र.पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के,

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री जावळे म्हणाले, सर्व शासकीय यंत्रणानी अतिधोकादायक व धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी करावी. या ठिकाणच्या नागरिकांना मान्सून कालावधीमध्ये सुरक्षित जागी स्थलांतरीत करता यावे यासाठी निवाऱ्याची सज्जता करावी. तसेच या काळात उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी व तहसीलदार यांनी उत्तम समन्वय राखत काम करावे. नगरपालिका, महानगरपालिकांनी नालेसफाईची कामे 31 मे पूर्वी पूर्ण करावीत. तसेच महाड शहरात दरवर्षी पूर परिस्थिती निर्माण होते. अशा पूरपरिस्थितीत मदत कार्य व बचावासाठी आवश्यक पूर्वतयारी व उपाययोजना केली जावी. सर्व शासकीय यंत्रणांनी आपदा मित्रांची बैठक घेऊन नियोजन करावे. आपत्तीच्या प्रसंगी रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग आदी विभागांनी देखील नागरिकांच्या मदत व सुरक्षेच्या दृष्टीने पूर्वतयारी करावी.

सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक पूलांची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती तात्काळ करावी व पर्यायी मार्ग सुस्थितीत ठेवावेत. तसेच रस्त्यावरील खडे, साईडपट्टी भरुन घेणे, रस्त्यावरील ब्लिंकर्स, बोर्ड, डायव्हर्शनचे बोर्ड, ब्लॅक स्पॉटवर रिफ्लेक्टर्स बसवावेत. सर्व विभागांकडील शोध व बचाव साहित्यांची दुरुस्ती करून सर्व साहित्य सुस्थितीत राहील, याची दक्षता घ्यावी. आवश्यक शोध व बचाव पथक, रुग्णवाहिका, स्थलांतराचे ठिकाण, अन्न पाण्याची व्यवस्था, जेसीबी मशिन्स, वूड कटर्स, बोट, लाईफ जॅकेट, स्पीड बोट, जनरेटर इ. साहित्य व मनुष्यबळ सर्व विभागांनी सज्ज ठेवावेत. पूर परिस्थितीमुळे रोगराई पसरुन साथरोगाचा धोका असतो. अशा ठिकाणी फवारणी करावी. पुरेसा औषधांचा साठा ठेवावा असे जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी सांगितले.

दुर्घटना ठिकाणी वैद्यकीय मदत तातडीने मिळण्याच्या दृष्टीने जिल्हा शल्य चिकित्सकांशी समन्वय राखून आरोग्य विभागास काम करण्याच्या सूचना श्री जावळे यांनी यावेळी दिल्या. याचबरोबर अतिवृष्टीमध्ये नागरिकांनी धबधब्याच्या ठिकाणी, गडकिल्ले, धोकादायक ठिकाणी जावू नये. तसेच रायगड पाटबंधारे विभागाने धरणांची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अतिवृष्टी विचारात घेवून टप्प्या-टप्प्याने धरणांतून विसर्ग करावा अशा सूचनाही श्री जावळे यांनी केल्या. जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, तसेच या काळात पूर्व परवानगी शिवाय कुणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश ही त्यांनी यावेळी दिले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री शिर्के यांनी तालुकास्तरीय नियंत्रण कक्ष 24 x7 कार्यान्वित बाबत, तसेच विविध विभागांचे परिपूर्ण आपत्ती व्यवस्थापन आराखडे जिल्हा प्रशासनास पाठवण्याबाबत सांगितले. पुनर्वसन सुरू असलेल्या गावांतील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबत सांगितले. विविध विभागांच्या वतीने यावेळी आगामी मान्सून पूर्व तयारी बाबत सुरू असलेल्या कामांबद्दल माहिती देण्यात आली .मागील वर्षी घडलेल्या इर्शाळवाडी येथील दुर्घटना यासह विविध माहिती यावेळी देण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी केले. या बैठकीला उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यासह एन डी आर एफ, होमगार्ड ,महावितरण , सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक परिवहन अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे अधिकारी यासह विविध शासकीय विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# रस्त्याच्या मधील खणलेला खड्डा बनतोय यमदूत

## मनसेने दिला आंदोलनाचा इशारा



**येथील खड्डा बुजविण्यास पालिका प्रशासनाला विसर पडला आहे. येथील खड्ड्यात पडून वाहनचालक जखमी झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार आहे का असा प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे. या खड्ड्यात पडून कोणी जखमी होऊ नये म्हणून येथील नागरिकांनी खड्ड्यात एक लाकडी बांबू उभा केला आहे. लाकडी बांबू पाहून वाहनचालक सावध होतील व त्यांची वाहने येथील खड्डयात पडणार नाही असे नागरिकांनी सांगितले.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली पूर्वेकडील गांधीनगर मधील सुभाष डेअरीच्या पुढील रस्त्यावर एक खड्डा खणण्यात आला आहे. अनेक दिवसांपासून हा खड्डा तसाच असून प्रशासनाच्या दुर्लक्षित कामकाजामुळे हा खड्डा भरण्यात आला नाही. त्यामुळे या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे डोंबिवली शहर अध्यक्ष मिलिंद म्हात्रे यांनी यावर आवाज उठवला आहे.प्रशासनाने येथील रस्त्यावरील खड्डा बुजविला नाही तर मनसे स्टाईलने आंदोलन केले जाईल असा इशारा दिला आहे.

डोंबिवली पूर्वेकडील गांधीनगर येथील ट्रान्सफॉर्मरजवळील रस्त्यावर अनेक दिवसांपासून खड्डा असून तो का खणण्यात आला आहे असा येथील नागरिकांना प्रश्न पडला आहे. सायंकाळी अथवा रात्रीच्या वेळी या खड्यात पडून वाहनचालक जखमी होण्याची शक्यता येत नाही.

मनविसेचे डोंबिवली शहरअध्यक्ष मिलिंद म्हात्रे यांनी याबाबत प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे.दोन दिवसात हा खड्डा बुजविला नाही तर मनसे स्टाईलने आंदोलन केले जाईल असा इशारा दिला आहे.

# तब्बल २२ वर्षानंतर जुने मित्र व मैत्रीणी एकत्र

## (कै.पु.न.गोडसे विद्यामंदिर वरसईच्या विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर)

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : धावता धावता थकून जाताना मग कुठे तरी विरंगुळा शोधला जातो याच उदान्त हेतूने २७ एप्रिल २०२५ रोजी कै.पु.न. गोडसे विद्यामंदिर वरसई येथील माजी विद्यार्थ्यांचा गेट -टुगेदर कार्यक्रम वरसई शाळेत येथे मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला . तब्बल 22 वर्षानंतर सर्व मित्र व मैत्रीणी पुन्हा एकदा आपल्या जुन्या आठवणी सोबत घेऊन एकत्रित आले. या कार्यक्रमाचे आयोजन कै.पु.न. गोडसे विद्यामंदिर वरसई येथे करण्यात आले होते. कामाच्या निमित्ताने अगदी दूरवर असलेल्या २९ मित्रांनी सहभाग घेऊन गप्पागोष्टी, मजा तसेच आनंद घेतला.

या कार्यक्रमास माजी शिक्षक पटणे सर, पुंडे सर, चौबे मॅडम, वरसई शाळेचे मुख्याध्यापक मुरूमकर सर व संस्थेमध्ये कार्यरत असलेले संतोष पाटील सर तसेच शाळेचे कर्मचारी . रमेश दरवडा उपस्थित होते. सुरुवातीस सर्व शिक्षकांचे औक्षण करण्यात आले. त्यानंतर सर्व शिक्षक व कर्मचारी यांचे शब्दसुमानांनी स्वागत केले. त्यानंतर सर्व शिक्षकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यादरम्यान सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सर्व शिक्षकांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जुन्या आठवणींना उजाळा देताना शालेय वातावरण पुन्हा एकदा अनुभवता यावा यासाठी कार्यक्रमाची सुरुवात हीच आमची प्रार्थना व हेच आमचे मागणे या प्रार्थनेने करण्यात आली. सर्व मित्रांनी खूप गंमत जंमत केली. कार्यक्रमांची प्रस्तावना झाल्यानंतर सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय शिक्षकांना करून दिला. काही विद्यार्थ्यांनी आपल्याला आठवणारे शाळेतील अविस्मरणीय क्षण सांगुण पुन्हा एकदा जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर सर्व शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करून शाळेचा आजपर्यंताचा प्रवास कसा झालाय हे सांगितल तसेच त्यांना या कार्यक्रमास बोलावल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले. सर्व विद्यार्थ्यांची चौकशी केली व सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यादरम्यान जे शिक्षक व विद्यार्थी या जगात नाहीत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांकडून शिक्षकांना व कर्मचारी यांना भेटवस्तू देण्यात आल्या व शाळेसाठी दोन मोठ्या सतरंज्या, सरस्वती प्रतिमा तसेच सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा देण्यात आल्या. यानंतर सर्व शिक्षकांच्या हस्ते गेट-टुगेदर चा केक कापून हार्दिक दिवस साजरा करण्यात आला व दरवर्षी आम्ही याप्रमाणे गेट-टुगेदर साजरा करू व आपल्याला आमंत्रित करू अशी खात्री सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांना दिली.

त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी निसर्ग फार्म हाऊस सापोली येथे जाऊन खूप धमाल केली. यादरम्यान सर्वांनी स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला. हास्य विनोद करत भोजन उरकले. प्रत्येकांनी आपल्या जुन्या आठवणी आपल्या मनोगतात मांडले. दरवर्षी एकत्र येण्याचं वाचन दिले. त्यानंतर प्रत्येक जण आपापल्या घरी गेट-टुगेदरच्या सुंदर आठवणी मनामध्ये साठवून सुखरूप रित्या घरी परतले.




# शिक्षण स्वाभिमानी संघटना आणि श्रमिक (मु.) पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला शिक्षण स्वाभिमानी संस्था' आणि श्रमिक (मु.) पत्रकार संघाचे वतीने इन्व्हर्टर भेट देण्यात आला. शिक्षण स्वाभिमानी संघटना खेड्यापाड्यातील अगदी शेवटच्या घटकांपर्यंत पोहचुन त्यांच्या अडीअडचणी समजून घेते. विद्यार्थ्यांच्या गरजा व त्याची परिपुर्ती करण्याची जबाबदारीही आपल्या कुवतीनुसार घेत असते. मुरबाड तालुक्यातील एकलहरे गावातील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा येथे अधुनमधून विद्युतपुरवठा खंडीत होत असतो. त्यामुळे शिक्षकांना अडचण होवुन विद्यार्थ्यांची ही गैरसोय होते. ही बातमी शिक्षण स्वाभिमानी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजय गायकवाड यांना समजताच शाळेसाठी एक इन्व्हर्टर ची सोय करून द्यावी हा निश्चय त्यांनी केला. श्रमिक (मु.) पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष आणि जेष्ठ समाजसेवक महेंद्र उर्फ अण्णा पंडित यांच्याशी संजय गायकवाड यांनी चर्चा करून एकलहरे येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिला.

शाळेचे मुख्याध्यापक संतोष म्हाडसे, शिक्षण कमिटी अध्यक्ष सुनील निचीते तसेच कमिटी सदस्या चंदना निचीते, रहीमा शेख, वैशाली निचीते, निशा निचीते आयोजीत छोटेखानी कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी शिक्षण स्वाभिमानी संघटना व श्रमिक (मु.) पत्रकार संघाच्या माध्यमातून शाळेसाठी मान्यवरांच्या हस्ते इन्व्हर्टर भेट करण्यात आला. या कार्यक्रमास जेष्ठ समाजसेवक अण्णा पंडित, संजय गायकवाड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

**नियमित वाचा**
**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




# डोंबिवली व कल्याण ग्रामीण भागातील विकासकामांबाबत शिवसेना ठाकरे गटाचे आयुक्तांना निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने कल्याण जिल्हा प्रमुख दिपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांची भेट घेऊन, डोंबिवली व कल्याण ग्रामीण परिसरातील विविध विकास प्रकल्प, नागरी समस्या व प्रशासनातील अडथळयांबाबत निवेदन सादर केले.

या निवेदनात वाहतूक नियोजनातील त्रुटी दूर करून वन-वे सिस्टीम व सिग्नल सिंक्रोनायझेशनची तातडीने अंमलबजावणी करणे. अपूर्ण कॉंक्रीट रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण करून स्वतंत्र देखरेख यंत्रणा स्थापन करणे. स्मार्ट सिटी व आरोग्य प्रकल्पांची गतीने अंमलबजावणी करणे. डोंबिवली-दुर्गाडी रिंग रूट (टप्पा ३) साठी स्वतंत्र सल्लागार समितीची नियुक्ती करणे. अमृत योजना अंतर्गत जलप्रकल्पांचे प्रभावी व्यवस्थापन करणे.एलसी-1 रेल्वे ओव्हरब्रिजचे प्रत्यक्ष काम तत्काळ सुरू करणे. जलवाहतूक रो रो सेवा लवकर सुरू करण्यासाठी अडथळे दूर करणे. प्रलंबित विकासकामांमध्ये गती आणण्यासाठी ठेकेदारांवर



**जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांनी घेतली केडीएमसी आयुक्तांची भेट**

कार्यक्षमतेचा दबाव वाढविणे.सार्वजनिक सुविधा – उद्याने, वाचनालये, दवाखाने – यांचे नूतनीकरण करणे. स्वच्छ भारत अभियानास गती व कचरामुक्त मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करणे.आपत्ती व्यवस्थापनासाठी व्यावहारिक व व्यापक आराखड्याची अंमलबजावणी करणे आदी विषय मांडण्यात आले.

यावेळी पत्रकारांशी बोलताना दिपेश म्हात्रे म्हणाले, "कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात २०१४ पासून आजपर्यंत कोणत्याही आयुक्तांना त्यांचा पूर्ण कार्यकाळ मिळालेला नाही. सर्वांना केवळ जवळपास १४ ते १६ महिन्यांपुरताच कार्यकाळ मिळाल्याने प्रशासन व विकासकामांमध्ये सातत्य राहिलेले नाही. सध्याचे आयुक्त अभिनव गोयल यांना तरी त्यांचा कार्यकाळ पूर्ण करू द्यावा, अशी आमची राज्य सरकारकडे मागणी आहे." तसेच, त्यांनी स्पष्ट केले की डोंबिवली शहर व कल्याण ग्रामीण परिसरात नागरिकांना अनेक मूलभूत समस्यांना तोंड द्यावे लागत असून, या समस्यांवर त्वरित व ठोस उपाययोजना राबवण्याची गरज आहे. आयुक्तांनी सर्व मुद्दे समजून घेतले असून, सकारात्मक कारवाईचे आश्वासन दिले आहे.

या निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधून डोंबिवली व कल्याण ग्रामीण विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी करण्यात आली आहे. दिपेश म्हात्रे यांनी सांगितले, "शासन व प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन या मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, हीच आमची अपेक्षा असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.



# अन्न व नागरी पुरवठा विभागातील जुने आदेश रद्द करा - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यात धान खरेदी, भरडाई, साठवण व वाहतूक प्रक्रियेत होणारे शासनासह शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी या प्रक्रीयेत सुधारणा करुन घ्यावी. आदिवासी शेतकऱ्यांना आपले धान ट्रायबल डेव्हलपमेंट कार्पोरेशन (टीडीसी) अथवा व्यापाऱ्यांना विकण्याचे दोन्ही पर्याय खुले करुन देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. तसेच वाहतुकीसह योग्य साठवणुकीअभावी होणारे धानाचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने राज्यभर जिल्हा जोडणी पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात विदर्भातील धान खरेदी व्यवस्थापनासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांतील धान खरेदी, भरडाई व साठवण प्रक्रियेसंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम, माजी केंद्रीय मंत्री खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार विनोद अग्रवाल, आमदार नरेंद्र भोंडेकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंघल, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, दूरदृश्य प्रणालीद्वारे गोंदियाचे जिल्हाधिकारी प्रजित नायर, भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी संजय कोलते, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविशांत पंडा, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर दुबे-पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांच्यासह अन्न व नागरी पुरवठा विभाग, आदिवासी विकास विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### मुरबाड तालुक्यातील

# भंगारव्यावसाईक फेरीवाल्यांची कोण करील चौकशी?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील शहरी वस्ती असलेल्या ठिकाणी ,आठवडी बाजार भरण्याच्या ठिकाणी, किंवा हायवे लगतच्या मोक्याच्या जागेवर ह्या पाकबांगलादेशी नागरिकांनी आपले बस्तान बसविले असून मुरबाड बाजारपेठ-किन्हवली-सरळगांव- म्हसा-टोकावडे-धसई शिवळे-ह्या ठिराणी भंगारव्यावसाईक स्थाईक झाले असून त्या कडे शेकडो तरूण सायकलवर किंवा स्कूटीवरून गावोगावी जाऊन भंगार गोळा करतात या व्यावसाईकांना कडून भाडा मिळतो म्हणून त्यांना रूम खोल्या देखील विनाचौकशी करून दिल्या जात आहेत गेल्या दोनचार वर्षा पासून यांची संख्या देखील वाढलेली असल्याचे बुरखाघातलेल्या महिलांच्या उपस्थिती वरून दिसून येते तसेच हे लोक कधीही एकत्र येत नसल्याची दक्षता घेतात बाजार हाट




करताना मात्र अनेक बुरखाधारी महिला संध्याकाळच्या वेळेस त्यांची बहूसंख्य उपस्थिती जाणवते भंगार व्यावसायात सोबत ज्यांना मुर्तिपुजा वर्ज ते मंदिरा बाहेर महादेवाच्या पिंडी वरील बेलपत्र ते आपल्या देवघरातील हारफुल या व्यावसायिकांनी कब्जा तर केला आहे, परंतु छोट्या छोट्या व्यावसायात देखील या परप्रांतियानी कब्जा केला आहे,

व्यावसायाच्या बाबतीत बोलायच झाल तर. गावोगावी उजाडायच्या आत, खारी, टोस,बटर ,लेलो भाभी जी,पहिली हाक ऐकायला मिळते ती युसूफभाई नंतर. मच्छी लेलो मच्छी ताजी ताजी बाजारात गेलात तर कुल्फी सरबत, हार गजरे भाजीपाला विक्रेता देखील त्याचा च भावबंद. देवळात दर्शनाला गेलात तर महादेवाला अभिषेक करायला बेलपत्र विक्रेता देखील अलीबा सलून मध्ये गेलात तरी. जुबैरभाई ,, रोजच्या जिवनात अत्यावश्यक बाबी चा विचार केला तर नगद धंदे जेवढे आहेत तेवढ्या धंद्यावर या पाकबांगला परप्रांतियानी व एक प्रकारे --ईन्सायनत के दुश्ममनोने कब्जा-- केल्याचे पाहता आपल्या व्यवसायावर व आणी आपल्या सुरक्षेवरच विपरित परिणाम होऊ लागला आहे व नसेल तर कधी होईल? याची वाट पहात बसून रहयाच काय ? घाटमाथ्यावरील शेतक-यांचा ऊस महत्प्रयासाने शहरी भागात आला परंतु त्या ऊसाच्या रसाचा ग्लास भरून देणारा मात्र त्या ऊसाच्या मातीचा नव्हे तर जातीचा चा देखील नसल्याने ऊसाच्या रसाच्या सोबत मराठीचा गोडवा देखील बेचव करून ठेवल्याचे पहावयाची सवय मात्र करून ठेवायला हवी मयताचे सामान विकणारा देखील परप्रांतिय असेल तर, आपण आपल्याच घरात स्पोटकाच्या वातीवर आहोत यात शंकाच नाही.




# अंबरनाथमध्ये अति धोकादायक इमारतींवर निष्कासनाची कारवाई

## मात्र महावितरण विभागाचा खोडा...



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : पावसाळा तोंडावर असताना शहरातील अति धोकादायक इमारती निष्कासीत करण्याचे नगररचना विभाग आणि उच्च न्यायालयाचे सख्त आदेश आहेत. त्या अनुषंगाने अंबरनाथ नगरपरिषदेने शहरातील साधारण २३ अति धोकादायक इमारतींवर निष्कासनाची कारवाई सुरू केली आहे. मात्र, यात रहिवासी सहकार्य करत नसून महावितरण विभाग कारवाईत असहकारचा खोडा घालत असल्याची खंत अंबरनाथ नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

अतिक्रमण विभागाचे प्रमुख नरेंद्र संख्ये यांनी मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या आदेशान्वये शहरातील अति धोकादायक आणि मोडकळीस आलेल्या अशा इमारतींवर निष्कासन कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. मान्सून येण्याआधी अशा इमारती ढासळून जीवित आणि वित्तहानी टळावी यासाठी त्यांनी इमारतींना नोटीसाही बजावल्या आहेत. एकिकडे, त्या इमारती रिकामी करण्याचे आवाहन करुनही शहरातील काही रहिवासी त्यास दाद देत नाहीत. तर दुसरीकडे, अशा अति धोकादायक इमारतींचा वीज पुरवठा खंडित करण्या कामी महावितरण विभागाचे अधिकारीही असहकाराचा खोडा घालत असल्याची खंत मुख्याधिकाऱ्यांनीही व्यक्त केली आहे.

नगररचना विभागाच्या २०१५ च्या परिपत्रक क्रमांक ३४९ आणि मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्र. ११३५ या २०१४ च्या आदेशानुसार अशा धोकादायक इमारती तातडीने निष्कासित करणे प्राधान्यावर आहे. याकरिता नगरपरिषद सर्वेक्षण करून पोलीस बंदोबस्ता सह अशा इमारतीं वर कारवाईची मोहीम हाती घेत आहे. परंतु, यापूर्वी महावितरण विभागाने वीज पुरवठा खंडित करणे आवश्यक आहे. मात्र महावितरण विभागाचे अधिकारी यात सहकार्य करीत नसल्याची माहिती नरेंद्र संख्ये यांनी दिली आहे. यामुळे निष्कासन कारवाईत खंड पडत असून भविष्यात अशा इमारती ढासळून जीवित वित्त हानी झाल्यास जबाबदारी कोण घेणार हा प्रश्नही संख्ये यांनी उपस्थित केला आहे. यासंदर्भात महावितरणाचे प्रजापती यांना विचारले असता, त्यांनी आम्ही सर्व इमारतींच्या एकत्र निष्कासना वेळेसच वीज खंडित करण्याची कारवाई करू असे सांगितले.

# मोहने येथील व्यापारी प्रवीण गडा यांच्यावर प्राणघातक हल्ला

## व्हिडिओ चित्रीकरण करणाऱ्या मुलासही केली मारहाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मोहने परिसरातील व्यापारी प्रवीण गडा यांच्यावर जमावाने पाठीमागुन येत प्राणघातक हल्ला केला असून खाजगी प्लंबरच्या बेकायदेशीर पाईप लाईन जोडणी बद्दल विचारणा केल्यामुळे गडा यांच्यावर हल्ला करण्यात आला आहे. या घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण करणाऱ्या प्रवीण गडा यांच्या मुलालाही बेदम मारहाण करण्यात आली आहे. ही घटना मोहने येथील जैन मंदिराजवळील रस्त्यावर घडली असून कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या मुख्य जलवाहिनीवर



पालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता बेकायदेशीरपने एका खाजगी प्लंबरकडून मुख्य वाहिनीला दोन इंची जलवाहिनी जोडणीचे काम सुरु होते. शासकीय मालमत्तेस हानी पोहोचवून आणि नियम धाब्यावर बसवून बेकायदेशीररित्या पाणीची पाईप लाईन जोडणी घेतली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्रवीण गडा यांनी याबाबत येथे काम करणाऱ्या खाजगी प्लंबरला विचारणा केली. तसेच ही जागा ही आमच्या मालकीची असून परवानगी शिवाय तुम्ही येथून नळ जोडणी कशी काय घेतली अशी विचारणा केली. यावेळी हल्ल्याच्या तयारीत असलेल्या ८ ते १० जणांच्या जमावाने गडा यांच्यावर जोरदार हल्ला चढवत त्यांना दगडगोटे लाथा बुक्क्यांनी जबर मारहाण केली.

या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून छातीत आणि मेंदूला जबर मार लागल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या हल्ल्याचा व्हिडिओ रेकॉर्ड करणाऱ्या प्रवीण गडा यांचा मुलगा पार्थ गडा याला देखील जमावाकडून लक्ष्य करून मारहाण करण्यात आली. मोबाईल हिसकावून मोबाईल फोडून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला या संपूर्ण प्रकारामुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून खडकपाडा पोलिसांनी संबंधित आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी गडा कुटुंबीयांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणी खडकपाडा पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# जपानी कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्याची मोठी संधी

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : भारत लहान अणुऊर्जा प्रकल्प आणण्याचा विचार करत आहे. जपानी कंपन्यांना यात मोठ्या संधी आहेत. भारत सरकार अणुऊर्जा क्षेत्रात खासगी गुंतवणूक सुरू करण्यासाठी कायद्यात बदल करत आहे. थोरियम इंधनाच्या वापराबद्दलही संशोधन सुरू आहे. सौर पॅनेल आणि टर्बाइन ब्लेड रीसायकलिंग मध्येही जपानकडे उत्तम तंत्रज्ञान आहे. जपानी कंपन्यांना भारतात सौर क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हॉटेल फोर सीजन येथे भारत-जपान पार्लियामेंट्री फ्रेंडशिप लीगचे अध्यक्ष आणि जपानचे अर्थ, उद्योग, व्यापार मंत्री निशिमुरा यासुतोशी यांच्यासमवेत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी राज्यसभा खासदार मिलिंद देवरा, उद्योग विभागाचे सचिव डॉ.अन्बळगन पी. मुख्यमंत्र्याचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे उपस्थित होते. बैठकीत पहलगाम येथील हल्ल्यात ज्यांना आपले प्राण गमावावे लागले त्यांच्याप्रती दुःख व्यक्त करण्यात आले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जपान सरकार आणि जायकाच्या सहकार्यामुळे मेट्रो, अटल सेतू यांसारख्या सर्व मोठ्या प्रकल्पांची उभारणी झाली आहे. भारतीयांच्या मनात जपानी व्यवसाय, उत्पादने, कंपन्या आणि लोकांबद्दल मोठा विश्वास आहे. पुणे येथे जपानी उद्योगांसाठी एक औद्योगिक पार्क सुरू केला आहे. तिथे जास्तीत जास्त जपानी कंपन्या याव्यात, अशी इच्छा आहे. सुमितोमो आणि ताइसेई या दोन्ही कंपन्यानी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. जपानचे शिपिंग क्षेत्रात सुद्धा मोठं सहकार्य आहे. भारतात डेटा सेंटर क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. महाराष्ट्र आज देशाचा डेटा सेंटर कॅपिटल झाला आहे. भारतातील ६५ टक्के डेटा सेंटर महाराष्ट्रात असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

स्टार्टअप्समध्येही आम्ही एकत्र काम करण्यास इच्छुक असल्याचे सागून मंत्री निशिमुरा यासुतोशी यांनी लवकरच जपानमध्ये एक सेमिनार आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. या सेमिनारसाठी उपस्थित राहण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंत्री श्री. यासुतोशी यांनी विनंती केली. यावेळी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी 'वेव्हज २०२५' बद्दल मंत्री श्री. यासुतोशी यांना माहिती दिली.

# आठ वर्षात २२६ गडकिल्ले सर करणारा अवलिया सुभाष मानकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : मुळात मुळशी तालुक्यातील कोरी गडाच्या पायथ्याशी छंद म्हणून शनिवार रविवार त्या किल्ल्यावर जाणे येणे असल्याने किल्ल्यांची आवड निर्माण झाली . छत्रपती शिवरायांबद्दल मनात प्रचंड आदर असल्यामुळे शिवरायांनी स्थापन केलेले गड किल्ले बघणे व त्यांचा अभ्यास करणे अशी इच्छा मनात आपोआप निर्माण झाली व त्यातूनच अनेक प्रकाराने किल्ले बघण्यास सुरुवात झाली



मुळशी तालुक्यातील दुर्गम डोंगर भागातील २७ किल्ल्यांना भेटी देत २०० किल्ल्यांचा ट्रेक अंबवणे या गावातील व पनवेलमधील गड किल्ल्यांचा ट्रेकर शिवदुर्ग संवर्धन प्रतिष्ठान अहमदनगरच्या सुभाष मानकर यांनी गड किल्ल्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी २०१७ पासून आजपर्यंत २२६ गड किल्ल्यांचा ट्रेक पूर्ण केले असल्याने सुभाष मानकर यांच्या साहसी वृत्तीचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. सन २००१ ते २०१५ या कालावधीत प्राथमिक शिक्षक म्हणून काम केल्यानंतर आज ते पनवेल येथील सीकेटी विद्यालय येथे मुख्याध्यापक म्हणून काम करत आहेत.

कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील गड किल्ले जवळजवळ पूर्ण केलेले असून प्रत्येक महिन्याला एक ट्रेकचे नियोजन केले जात असून त्यांनी आतापर्यंत पुणे, रायगड, ठाणे, सातारा, नाशिक, पालघर, कोल्हापूर, धुळे, जळगाव, गोवा, कर्नाटक, गुजरातच्या किल्ल्यांचे भ्रमण केले आहे. किल्ल्यांचा अनमोल ठेवा पुढील पिढीला प्रेरणादायी ठरावा त्यांचे संरक्षण व संवर्धन व्हावे याकरिता गड किल्ल्यांवर जाऊन त्यांनी वाढलेले गवत, प्लास्टिक जमा करणे, गड किल्ल्यांची सफाई साफसफाई व परिसर स्वच्छता अशा मोहिमांमध्ये सहभाग घेऊन प्रत्येक गडकोट किल्ल्यांचे फोटो व त्याची माहिती घेत गडकोट किल्ल्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आतापर्यंत २२६ किल्ल्यांचा ट्रेक पूर्ण केला आहे.

रविवार आणि जोडून सुट्टी आली की महिन्यातून एक दोन किल्ले तरी बघितले जातात किंवा ज्या वेळेस मे महिना आणि इतर वेळेस सुट्टी असते त्या सुट्ट्यांचा वेळेत किल्ले बघणे हा छंद जोपासला जातो.

गड किल्ल्यांचे नियोजन करताना सांगितले की आम्ही एका दिवसामध्ये अवघड किल्ला असेल तर एकच करतो मध्यम श्रेणीचा किल्ला असेल तर एका दिवसात दोन किंवा तीन किल्ले करतो आणि भुईकोट किल्ला असेल तर एका दिवसात पाच ते सहा किल्ले होतात अशा प्रकारे नियोजन करून त्याची अंमलबजावणी केली जाते

पहिल्यांदाच मी हरिहर किल्ल्यावरती गेलो पण हरिहर हा किल्ला काटकोनात उभा आहे आणि सरळ पायऱ्यांचा आहे अर्ध्यावर गेलो आणि मला चक्कर यायला लागली मी अक्षरशः तिथे एक तास बसून राहिले मग नंतर मला माझ्या सहकाऱ्यांनी कसेबसे वरती घेऊन गेले कारण तो किल्ला अतिशय अवघड श्रेणीचा आहे पण नंतर ठरवले की नाही आपण आपली हिंमत हरायची नाही आपली उंचावर जाण्याची भीती मोडली पाहिजे या उदात्त हेतूने प्रेरित होउन मी सतत किल्ले सर करत करत माझी भीती पूर्ण मोडून काढली आहे.

मागील वर्षी शिवलिंग शुल्क लोणावळया जवळ आहे त्यावर आम्ही चार-पाच जण चढाई करत होतो वरती गेलो आणि खाली उतरताना आम्हाला खूप त्रास झाला आणि अर्ध्यावर आमचे पाणी संपले मग आम्ही ते पाणी जनावरे माकड वगैरे पाणी पितात त्या ठिकाणचे पाणी चार ते पाच वेळा गाळून ते पाणी आम्ही पिले म्हणजे यातून मला एक शिकायला मिळाले की किल्ल्यावर जाताना तुमच्याकडे मुबलक पाणी असणे गरजेचे आहे. शेवटी एकच निश्चय करून सांगतो की शेवटच्या क्षणापर्यंत मी 500 किल्ले सर करणार असा मानस सुभाष मानकर यांनी केला.




# महापुरुषांचे विचार कृतीत आणा

**: प्रा. पंकज भारतीय**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर : सत्य हे कधीच लपत नाही. सत्यामुळेच जीवनाला आकार आणि आधार मिळत असतो असे प्रतिपादन प्रा. पंकज भारतीय यांनी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील सम्यक जीवन दर्शन महोत्सवात बोलताना केले. महाड च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात, सुरु असलेल्या ' सम्यक जीवन दर्शन महोत्सव २०२५' चे दूसरे पुष्प गुंफताना अमरावती येथील प्रा. पंकज भारतीय हे बोलत होते.

यावेळी प्रा. पंकज भारतीय यांनी, महापुरुषांची जयंती उत्सव व आजची तरुणाई या संदर्भात अतिशय परखड शब्दात विचार मांडले. आज सर्वत्र महापुरुषांची जयंती ढोल, ताशे, लेझीम, डी जे यांच्या संगीतमय तालावर नाचून साजरी केली जात आहे. ज्या मधून आपल्याला क्षणिक आनंद मिळत असतो. मात्र, त्यांच्या प्रेरणादायी विचारांचे कृतीशील अनुकरण आणि त्यांची लोक कल्याणकारी चळवळ आपण पुढे नेताना आढळत नाही, आज त्याचीच गरज आहे असे प्रा. पंकज भारतीय यांनी आपल्या भाषणातून खंत व्यक्त केली. या वेळी त्यांनी संविधानातील अधिकार, हक्क, जवाबदारी, कर्तव्य काय व कसे आहेत आणि ते प्राप्त करण्यासाठी आपण कसे वागावे आणि जगावे याचा जीवन मुल्यात्मक मौल्यवान संदेश दिला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश बोराळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. पंकज भारतीय सरांनी जो विचारांचा प्रभाव दिला आहे, तो कायम तेवत ठेवा, असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी, समाज कल्याण विभागची मुले आणि मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, मोरे सर आणि मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि त्रिशरण, पंचशीलेचे पठन पराग माने यांनी केले. प्रा.बाबासाहेब सोनकांबळे यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.







'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024